## महाराष्ट्र शासन

क्र.संकीर्ण २०२०/प्र.क्र. ५६ /ई-१
महसूल व वन विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- २४ जुलै, २०२०

प्रति,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी.

विषय :- दिनांक १ ऑगस्ट हा "महसूल दिन" म्हणून साजरा करणेबाबत.

संदर्भ :- १. शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.संकिर्ण १०/००/प्र.क्र.३०६/म-५, दि.१९.७.२००२
२ शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक संकिर्ण ०२/२०१०/प्र.क्र.१२/ई १, दि.०६.०९.२०११

जिल्हा स्तरावरील महसूली कामे वेळच्या वेळी पूर्ण करुन त्यानुसार अभिलेख अद्यावत करणे, वसुलीच्या नोटीसा पाठविणे, मोजणी करणे, अपील प्रकरणांचा निपटारा करणे इत्यादी कामे वेळेच्या वेळी व वेळापत्रकानुसार करणाऱ्या आणि महसूल वसुलीचे उद्दिष्ट पार करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्याकरीता तसेच महसूल विभागाने केलेल्या कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवण्याकरिता **दिनांक १ ऑगस्ट** हा दिवस **"महसूल दिन"** म्हणून साजरा करण्यात यावा, असे संदर्भाधीन दिनांक १९/०७/२००२ च्या शासन परिपत्रकान्वये निर्देश देण्यात आलेले आहेत. त्याचे कृपया अवलोकन व्हावे.

२. त्याअनुषंगाने दि.०१.०८.२०२० रोजी महसूल दिनाचा कार्यक्रम तालुका व जिल्हा स्तरावर आयोजित करण्यात यावा. या कार्यक्रमामध्ये समाजातील सर्व थरातील नागरिकांना सहभागी करण्यात यावे. जिल्हाधिकाऱ्यांनी आपल्या कल्पकतेने हा कार्यक्रम अधिकाधिक आकर्षक करण्याच्या दृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन करावे. सदर कार्यक्रमात प्रामुख्याने खालील विषयांच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी.

१. महसूल विभागात क्षेत्रिय स्तरावर उत्कृष्ट काम करणाऱ्या अपर जिल्हाधिकारी, उप जिल्हाधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार, अव्वल कारकून, मंडळ अधिकारी, लिपिक, तलाठी आणि कोतवाल इत्यादि संवर्गातील उत्कृष्ट अधिकारी/ कर्मचारी यांची निवड संदर्भाधीन दि.०६.०९.२०११ च्या शासन निर्णयात विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार करावी व त्यांचा गौरव-सन्मान **जिल्हा स्तरावर** करण्यात यावा.
२. महाराजस्व अभियान राबविण्याची सुरुवात करावी.
३. शासनाने गेल्या पाच वर्षात विविध कायदे/ नियमात केलेल्या सुधारणांना प्रसिध्दी द्यावी.
४. शासनाबद्दल व शासनाच्या कामकाजाबद्दल विश्वास वृध्दिंगत करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत.

५23/2020

३. वरीलप्रमाणे आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाचे आयोजनपूर्व व आयोजन पश्चात प्रसिध्दीसाठी प्रसिध्दी माध्यमांचे सहकार्य घ्यावे.

Scanned with CamScanner

Scanned by CamScanner

४. महसूल दिनाच्या आयोजनाकरीता येणारा खर्च कार्यालयीन खर्चासाठी उपलब्ध तरतूदीतून करण्यात यावा. तसेच, सद्य:स्थितीत संपूर्ण देशाप्रमाणेच राज्यात उद्भवलेल्या कोरोना संसर्गाच्या परिस्थितीचे गांभिर्य लक्षात घेता, उक्त महसूल दिनाच्या आयोजनाच्या वेळी कार्यक्रमाचे स्वरुप हे अत्यंत साधेपणाने, कोणताही अनावश्यक खर्च टाळण्यात येवून, आणि कोरोना संसर्ग टाळण्याच्या अनुषंगाने शासनाद्वारे / संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांव्दारे वेळोवेळी विहीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करून व संबंधित कार्यक्रमाच्या ठिकाणी सामाजिक अंतराचे पालन करून साजरा करण्याबाबतची आवश्यक ती दक्षता घ्यावी व याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

(डॉ.नितिन करीर)
अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी)
महसूल व वन विभाग

Scanned by CamScanner